# पोलीस स्मृतिदिन संचलन

## २१ ऑक्टोबर, २०२४

# Police Commemoration Day Parade

## 21st October, 2024

# पुणे शहर पोलीस आयुक्तालय

सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता
पोलीस संशोधन केंद्र, पाषाण, पुणे येथे

# पोलीस स्मृतिदिन संचलनास

आपणास उपस्थित राहण्याची विनंती करीत आहेत.

## मा.श्री. दत्ता पडसलगीकर

माजी. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.

हे पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करणार आहेत.

पोषाख : राष्ट्रीय/समारंभीय

पोलीस अधिकारी : रिव्ह्यू ऑर्डर टाईप बी

कृपया ही निमंत्रण पत्रिका सोबत आणावी आणि सकाळी ७.५० वाजता आसनस्थ व्हावे.

# Pune City Police Commissionerate

**Solicit your presence**
**at**

# Police Commemoration Day Parade

**On Monday, the 21 October 2024 at 8.00 a.m.**
**at the Centre for Police Research,**
**Pashan, Pune.**

## Shri. Datta Padsalgikar

**Ex. Director General Of Police, Maharashtra State.**

**has kindly consented to lay the wreath.**

**Dress: National/Formal** **Police Officers: Review Order Type B**

**Kindly carry this card and be seated by 7.50 a.m.**

# कार्यक्रम

- ✻ मा. प्रमुख पाहुणे यांचे आगमन.
- ✻ मा. प्रमुख पाहुणे संदेश वाचून दाखवतील.
- ✻ परेड सावधान होईल. परेड ''शोक शस्त्र'' करील. वीरगती प्राप्त झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची व शिपायांची नावे वाचली जातील.
- ✻ मा. प्रमुख पाहुणे पुष्पचक्र वाहतील. परेड ''जनरल सॅल्यूट'' देईल. (सर्व उपस्थितांनी उभे रहावे व गणवेशातील सर्वांनी सॅल्यूट करावा. ''जनरल सॅल्यूट'' संपल्यावर आसनस्थ व्हावे.)
- ✻ परेड तीन वेळा फेरी झाडील.
- ✻ परेड जनरल सॅल्यूट देईल. ब्युगलर्स ''लास्ट पोस्ट'' वाजवतील त्यानंतर १ मिनीटाची स्तब्धता पाळण्यात येईल व नंतर ब्युगलर्स (राऊज) वाजवतील. (सर्व उपस्थितांनी उभे रहावे व गणवेशातील सर्वांनी सॅल्यूट करावा.)
- ✻ परेड कमांडर मा. प्रमुख पाहुणे यांना संचलन संपल्याचे सांगतील व कार्यक्रमाची सांगता होईल.

# Programme

- ✻ Arrival of Hon. Chief Guest.
- ✻ The Chief Guest will read out the Message.
- ✻ Parade will come to attention. The parade will come to "Shok Shastra." Names of Departed Police Officers and Policemen will be read out.
- ✻ The Chief Guest will lay the Wreath. Parade will present "General Salute". (Invitees will be requested to Stand. Those in uniform will Salute. All of them may resume their seats after the "General Salute".)
- ✻ Parade will fire 3 volleys in air. Parade will present "General Salute".
- ✻ Buglers sound "Last Post" and "Rouse". (Invitees will be requested to stand. Those in uniform will Salute.)
- ✻ Parade Commander will report to the Chief Guest that the Parade is over.

# पोलीस स्मृतिदिन

२१ ऑक्टोबर हा दिवस देशातील सर्व पोलीस दलांचे अधिकारी व शिपाई यांच्या दृष्टीने अत्यंत पवित्र समजला जातो. ह्या दिवशी १९५९ मध्ये पोलीस दलातील १० शिपाई 'हॉट स्प्रिंग्ज' या सीमेवरील बर्फाच्छादित निर्जन ठिकाणी गस्त घालीत असता, दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात ठार झाले व त्यामुळे सर्व भारतभर दुःखाची छाया पसरली. त्या वेळेपासून दरवर्षी या दिवशी त्या शूर शिपायांच्या वीरमरणाची आणि आम्हा सर्वांना पुन्हा आपल्या जनतेसाठी कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणून संचलन आयोजित केले जाते.

सध्या पोलीसांना नुसतीच कायदा व सुव्यवस्था पाहावी लागत नसून हिंसाचारी, गुन्हेगारी, दहशतवादी, देशद्रोही आणि समाजद्रोही यांच्याशीही सामना करावा लागतो. कायद्याचे पालन करणाऱ्या नागरीकांना सरंक्षण देतांना अनेक अधिकाऱ्यांना व शिपायांना आपले प्राण गमवावे लागतात. या दिवशी त्यांच्या या सर्वोत्तम त्यागास व कर्तव्य बजावीत असताना त्यांना प्राप्त झालेल्या वीरगतीस मानवंदना दिली जाते.

गतवर्षी कर्तव्य बजावीत असताना प्राप्त झालेल्या अधिकाऱ्यांची व शिपायांची नावे पोलीस स्मृतिदिन संचलनात वाचली जातात व स्मृतिस्तंभावर कृतज्ञतापूर्वक पुष्पचक्र अर्पण केले जाते. हा प्रसंग सर्व भारतभर मातृभूमीकरिता त्यांनी केलेल्या सर्वोत्तम त्यागासाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा तसेच आम्हा पोलीसांना पुन्हा कर्तव्यनिष्ठेचे स्मरण करून देणारा आहे.

# POLICE COMMEMORATION DAY

The 21st of October is a sacred and solemn day for all officers and men of the Police Forces of this country. It is on this day in the year 1959, that a batch of 10 policemen who had gone as a patrolling party to a place called "Hot Springs", in the icy wilderness of our borders in Ladakh were ambushed and shot dead by the Chinese Army, plunging the whole nation in sorrow. Since then, to commemorate the martyrdom of these brave policemen we have been holding a Parade on this day every year to mourn their death and to re-dedicate ourselves to the people and our country.

The police today are engaged not only in the task of maintaining law and order but also in combating violent criminals, terrorists and anti-social / anti-national elements. Every year, in this great task of providing safety and security to the law-abiding citizens, many officers and men lay down their lives. We remember the supreme sacrifice of all these brave officers and men on this day.

The names of those officers and men who have laid down their lives in the performance of their duties during the preceding year are read out on the occasion of the Commemoration Parade and a wreath is laid on the cenotaph. This is an occasion to remember those who made the supreme sacrifice and re-dedicate ourselves to the service of the motherland.